पोस्ट रजि.नं.-AR/TECH NO RNP-JAL/120/2019-21

ऑनलाईन साप्ताहिक वाचण्यासाठी
आमचा क्युआर कोड स्कॅन करा.

साप्ताहिक
# गोदावरी
परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

* वर्ष २३ वे * अंक ४७ * सोमवार २१/११/२०२२ * डाक २३/११/२०२२ * पाने - ६ * किंमत २ रुपये

आई माझा गुरु,
आई कल्पतरू...!



आई महोत्सव
( मातृवंदन सोहळा )
७ डिसेंबर २०२२

## मातृवंदन सोहळा न भूतो न भविष्यति होणार

### आई महोत्सवाची जय्यत तयारी सुरू

**जळगाव - गोदावरी फाउंडेशन या परिवारासाठी सुवर्णक्षण ठरणाऱ्या मातृवंदन सोहळ्याची जय्यत तयारी केली जात आहे. न भूतो न भविष्यती असा हा सोहळा होणार असून गोदावरी परिवाराच्या आधारस्तंभ असलेल्या श्रीमती गोदावरी पाटील यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता दि. ७ डिसेंबर रोजी आई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**

करावे किती आई तुझे कौतुक, अपुरे पडती शब्द माझे, नाही फेडू शकत उपकार आई तुझे आई या शब्दातच सारे जग सामावले आहे. ज्या मातेच्या उदरी जन्म घेण्याचे भाग्य लाभले, कबाड कष्ट करून ज्या मातेने संस्कारक्षम बनविले, जिने समाजाच्या सेवेचा वारसा दिला अशा गोदावरी आई यांच्याबद्दल शब्दही अपुरे पडतील. आईच्या ऋणातून कुणालाही मुक्त होता येत नाही. तरी देखिल आईप्रति कृतज्ञता म्हणून आई महोत्सवांतर्गत मातृवंदन सोहळा दि.७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याची जय्यत तयारी केली जात आहे. या भव्यदिव्य सोहळ्यासाठी नैमिषारण्य व्यास गादीपती प.पू. भागवताचार्य शैलेंद्रजी शास्त्री यांची सपत्नीक उपस्थिती लाभणार आहे. तसेच समाजातील प्रतिष्ठीत मान्यवरही या सोहळ्याला उपस्थिती देणार आहेत. न भूतो न भविष्यती अशा या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी आवर्जून उपस्थिती द्यावी असे आवाहन गोदावरी परिवाराचे प्रमुख डॉ. उल्हास पाटील, सुभाष पाटील, सौ. वर्षा पाटील, सौ. सुषमा पाटील, डॉ. वैभव पाटील, डॉ. केतकी पाटील आणि डॉ. अनिकेत पाटील व गोदावरी फाऊंडेशन यांनी केले आहे.

## धनुर्वाताच्या एक वर्षीय बालकावर प्रभावी उपचार

### डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात आयुषमान योजनेचा लाभ

**जळगाव - मध्यप्रदेशातील आदिवासी भागातील मूळ रहिवासी असलेल्या बारेला दांम्पत्याच्या १ वर्षाच्या बालकाचे शरिर कडक होवून गेले, तोंडही उघडत नव्हते, झटकेही येत होते त्यावरुन न्यूमोनेटल टिटॅनस अर्थात धनुर्वात झाल्याचे निदान करुन बालरोग तज्ञांद्वारे उपचार करण्यात आले. डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात आयुषमान भारत योजनेंर्तगत उपचार झाले असून ८ दिवसातच बाळ पूर्वीप्रमाणे हसू-खेळू लागला.**

सविस्तर वृत्त असे की, मुळचे मध्यप्रदेशातील रहिवासी मात्र कामानिमित्त यावल तालुक्यातील हिंगोो येथे वास्तव्यास मालसिंग बारेला यांच्या बाळाला जन्मापासून एकही लस दिली गेली नाही. याशिवाय तीन महिन्यापासून बाळाचे दोन्ही कान फुटले(पू) होते. तात्पुरते उपचार करुन जळगाव सिव्हील येथे दाखल झालेल्या बालकाची गंभीर प्रकृती पाहून ८ नोव्हेंबर रोजी बाळाला गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात जाण्यास सांगितले. येथे बालरोग तज्ञ उमाकांत अणेकर, डॉ.अनंत बेंडाळे, डॉ.विक्रांत देशमुख यांनी बालकाची तपासणी केली



आणि लक्षणांवरुन न्यूमोनेटल टिटॅनस असल्याचे निदान केले.

टिटॅनसचा रुग्णाचे भविष्य फार काहीसे चांगले नसते मात्र प्रभावी उपचार आणि तज्ञ डॉक्टरांची फळी रुग्णालयात सक्रीय असल्याने एक वर्षीय साईमल नामक बाळाची आजारातून सुटका झाली. यावेळी सदर बालकाला टिटॅनस ह्यूमन इमुनोग्लोबिन ५०० युनिट व इंजेक्शन कॉम्पोल पॉईंट टू आणि पॉईण्ट थ्री मिलिग्राम पर केजी, सहा तासाच्या कालावधीत दिली, त्यामुळे बालकाची प्रकृती सुधारली. तज्ञांसमवेत निवासी डॉ. दर्शन राठी, डॉ.प्रज्ञिल रांगणेकर, सिस्टर गीता, कल्याणी, आकांक्षा ससे, इंटर्न नौरीन, रोशनी, अंकुश, सुरेंद्र गुप्ता यांनी बालकाची देखभाल केली. शासनाच्या आयुषमान भारत या योजनेंतर्गत रुग्णावर उपचार करण्यात आले.

*धनुर्वात या आजार अनेक दशकांपासून नाहीसाच झाला असून येथे वर्षभराच्या बालकाला धनुर्वात झाल्याचे निष्पन्न झाले. डॉ.विक्रांत वझे यांच्या एक वर्षाच्या कार्यकाळात पहिल्यांदाच तर डॉ.उमाकांत अणेकर यांच्या ३० वर्षाच्या वैद्यकीय सेवेतील टिटॅनसचा हा पहिलाच रुग्ण होता.*

## मृत्यूच्या दाढेतून रुग्णाला डॉक्टरांनी आणले खेचून

**जळगाव - बिडी-सिगारेट, तंबाखू, दारु अशा सर्व प्रकारचे व्यसन असलेला रुग्ण बेशुद्ध पडून मृत्यूच्या दारात गेला होता, मात्र डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करुन त्याला मृत्यूच्या दाढेतून खेचून आणले. डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार केले जात असल्याने रुग्णाचे प्राण वाचतात.**

### महात्मा ज्योतिबा फुले योजनेतून उपचार

अधिक माहिती अशी की, डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील मेडिसीन विभागाच्या अतिदक्षता विभागात ५ नोव्हेंबर रोजी रसुल मावती नामक ५५ वर्षीय रुग्ण बेशुद्धावस्थेत दाखल झाला होता. रुग्णाला बघताच डॉक्टरांनी ही सिरीयस केस असून तातडीने उपचार सुरु केले. रुग्णाच्या यकृतावर सूज होती तसेच पोट खूप फुगले होते. दरम्यान रुग्णाची टू डी इको तपासणी, अँबडॉमिनल एक्स रे सह आवश्यक रक्ताच्या तपासण्या करण्यात आल्या.



रुग्णालयात मेडिसीन तज्ञ डॉ.चंद्रया कांते, डॉ. पूजा तन्नीवार यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णाला व्हेंटीलेटरवर ठेवले तसेच पाच दिवसानंतर रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने व्हेंटीलेटर काढण्यात आले. शास्त्रशुद्धरित्या उपचार झाल्याने सातव्या दिवशी रुग्णाची प्रकृती स्थिर झाली. निवासी डॉ.कलीम, डॉ.अब्दुल्ला, ब्रदर राहूल विचवे यांनी रुग्णाची देखभाल केली. महात्मा ज्योतिबा फुले योजनेतून रुग्णावर उपचार करण्यात आले.

आरोग्यासाठी व्यसन किती घातक ठरले, याचे महत्व रुग्णाला पटले, त्याबाबत रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञांद्वारे रुग्णाचे समुपदेशनही करण्यात आले. त्यामुळे आता कुठलही व्यसन करणार नाही, असे रुग्णाने सांगितले.

## गोदावरीतील उपचारामुळे रुग्णाला मिळाली पुन्हा कुटूंबियांची साथ

**जळगाव - गेल्या तीन वर्षापासून कुटूंबियांनी सोडून दिलेल्या ४० वर्षीय व्यक्ती रस्त्यावर पडल्याने त्याला डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले. इएनटी तज्ञांद्वारे उपचारांती मानसोपचार तज्ञांनी तपासले असता रुग्णाला स्क्रिझोफेनिया जडल्याचे निष्पन्न झाले. रुग्णावर उपचार केल्यामुळे रुग्ण सामान्य व्यक्तीप्रमाणे जीवन जगू लागला असून त्याच्यातील बदल पाहून कुटूंबिय पत्नीदेखील आता त्याच्याबरोबर राहू लागली.**

ही घटना आहे नशिराबाद येथील... मागील ४ ते ५ वर्षांपासून रुग्णाला भास होणे, स्वत:शीच बडबड करणे असा त्रास होत होता. कुटूंबियांनी दुर्लक्ष केले, एकाच वेळी रुग्ण आभासी जग आणि वास्तव जग असे जीवन जगत होता. आभासी जगात



जगत आहे, तेथील चांगले-वाईट लोक असे काहीसे दृश्य त्याला दिसायचे आणि तो पाच पाच किलोमीटर चालत जायचा, त्याच्या अशा वागण्यामुळे पत्नीसह कुटूंबिय दूर झाले, तो एकटाच राहू लागला. अशातच तो रस्त्याने जात असतांना पडला, चेहऱ्याला दुखापत झाल्याने नशिराबाद येथून जवळच असलेल्या डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात त्याला दाखल करण्यात आले.

चेहऱ्यावरुन रक्त येत असल्याने सर्वप्रथम इएनटी तज्ञांनी त्याच्यावर उपचार केले. काही दिवसांनी सदर रुग्ण हा मनोविकारी असल्याचे लक्षात आल्याने रुग्णालयातीलच मानसोपचार तज्ञांनी रुग्णाची हिस्ट्री जाणून घेतली. त्यातून रुग्ण हा स्क्रिझोफेनियाचा असल्याचे निदान झाले आणि त्याला ट्रिटमेंटही सुरु झाली. काही दिवसातच रुग्ण पुन्हा सामान्य आयुष्य जगू लागला, आता त्याचे कुटूंबिय, पत्नीदेखील त्याच्यासोबतच राहू लागली. रुग्णावर मनोविकार तज्ञ डॉ. विलास चव्हाण, निवासी डॉ.गोविंद यादव, डॉ.मुजाहिद शेख यांनी उपचार केले. एकूणच रुग्णाचे आयुष्य पूर्वपदावर येवून कुटूंबियांचीही साथ त्याला पुन्हा गोदावरीमुळे मिळाल्याबद्दल, त्याने आभार मानले.

सायकोसिस आजाराची लक्षणं वेळीच ओळखली तर तात्पुरत्या औषधोपचाराने रुग्ण पूर्ण बरा होता. मात्र या



रुग्णाच्याबाबतीत भरपूर काळ लोटला गेल्याने आता आयुष्यभर त्याला औषधी घ्यावी लागणार आहे. मात्र तो आता सामान्य आयुष्य जगू शकत आहे. स्क्रिझोफेनियाची लक्षणे जाणून घेतल्यास तशा प्रकारचा त्रास कुणाला होत असल्यास रुग्णालयात येण्याचा सल्ला द्यावा, त्वरित उपचाराने रुग्ण बरा होतो.

डॉ.गोविंद यादव
निवासी डॉक्टर

**लक्षणे**

* स्वत:शीच बडबड करणे
* संशय घेणे
* आपल्या विरोधात इतर लोक आहे असा भास होणे
* कानात आवाज ऐकू येणे

ही स्क्रिझोफेनियाची लक्षणे आहे.



# रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

**कुठल्याही दानापेक्षा रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान समजले जाते. आपातकालीन ठिकाणी किंवा सर्जरीच्या रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी रक्ताची आवश्यकता असते, त्यापार्श्वभूमीवर गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ.उल्हास पाटील रक्तपेढीतर्फे व सामाजिक संस्थांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जात असून त्यास जागरुक नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे.**




## सालबर्डी, ता.मुक्ताईनगर; ३१ दात्यांचा सहभाग

स्वातंत्र्य सेनानी भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्त सालबर्डी तालुका मुक्ताईनगर येथे सालबर्डी विकास फाऊंडेशन च्या माध्यमातून ३१ तर त्यांनी केले रक्तदान प्रथमतहा सरदार वल्लभभाई यांच्या



प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

सरपंच राणेताई, पंकज राणे, सुमित झांबरे कुणाल श्रीकांडे,भूषण धांडे, धनराज झांबरे,सुवर्ण ब-हाटे, हेमंत पाटील, ललित खडसे, भूषण नाकाडे, सागर बऱ्हाटे, अनंत बऱ्हाटे यांनी रक्तदान करून सहकार्य केले.

## खर्ची-रिंगणगाव गट; ३५ जणांनी केले रक्तदान

जिल्हा परिषद सदस्य नानाभाऊ महाजन (खर्ची-रिंगणगाव गट) यांच्या वाढदिवसानिमित्त खर्ची तालुका एरंडोल येथे ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी किशोर पाटील, बाळा अहिरे, कमलेश महाजन, नवल माळी, प्रवीण माळी, युवराज अहिरे, डॉ.विजय मराठे, संतोष अहिरे, सुशील महाजन, रामचंद्र देवरे, नितीन शिरसाळे, हिरालाल मराठे, गणेश मराठी, पूनम पांडे, दिपाली पांडे, सुनीता पांडे, रवींद्र अहिरे, भुरा महाजन, धीरज महाजन, राजेंद्र मराठे, किशोर पाटील यांनी रक्तदान करून सर्व गावकरी मित्र मंडळाचे सहकार्य लाभले.

## भुसावळ येथे मुस्लीम मंचतर्फे रक्तदान शिबिर

भुसावळ - मुस्लिम मंच भुसावळ यांच्यातर्फे उर्दू शाळा क्रमांक तीन रजा चौक भुसावळ येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात पंचवीस रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिबिर यशस्वीतेसाठी रक्तपेढीचे डॉ.नितीन भारंबे, समन्वयक लक्ष्मण पाटील, टेक्निशियन अमोल चौधरी, शेख सैय्यद, यश पाटील यांनी परिश्रम घेतले.



# चुंचाळे शिबिरात टू डी इकोची तपासणी

**चोपडा - तालुक्यातील चुंचाळे येथे गोदावरी फाऊंडेशनतर्फे मंगळवार, १५ नोव्हेंबर रोजी मोफत टू डी इको तपासणी तसेच महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.**



चुंचाळे येथील श्री विठ्ठल मंदिरात शिबिर घेण्यात आले असून त्यात मोफत टू डी इको तपासणी करण्यात आली, याशिवाय रक्तदाब व ईसीजी कार्डिओग्राफही करण्यात आला. शिबिरात डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील निवासी डॉ.आकाश, डॉ.दिनेश, डॉ.अमेय, इंटर्न शुभांगी, आलिशा, रितू, पियूष यांनी रुग्णांची तपासणी केली. ८० रुग्णांची तपासणी करण्यात आली असून त्यातील १६ रुग्णांवर रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत उपचार केले जाणार आहे. शिबिरस्थळी सुशिला सैंदाणे, शुभम चौधरी, आत्माराम सैंदाणे, रावसाहेब पाटील, विश्वनाथ बाविस्कर, सचिन पाटील, सुरेश बाविस्कर यांचे सहकार्य लाभले.

## चापोऱ्यातील नागरिकांच्या नेत्रतपासणी

**बऱ्हाणपूर - जिल्ह्यातील चापोरा येथील ग्रामपंचायत भवना मंगळवार, १५ नोव्हेंबर रोजी नेत्ररोग तपासणी व शस्त्रक्रिया अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.**



या शिबिरात निवासी डॉ.शिफा मिर्झा, डॉ. आशुतोष, डॉ.स्मृती भोजने यांनी रुग्णांची तपासणी केली. ७१ नागरिकांनी लाभ घेतला असून त्यातील ७ जणांना डोळ्यांचे ऑपरेशन तसेच ३ जणांना शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे. मध्यप्रदेशातील रुग्णांवर डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात प्रधानमंत्री आयुषमान योजनेंतर्गत उपचार केले जातात.

# हिवरखेड्यात भरला आरोग्याचा मेळा

**अकोला - जिल्ह्यातील तेल्हारा जवळील हिवरखेडा येथे शुक्रवार, १८ नोव्हेंबर रोजी आरोग्याचा मेळा भरला होता. यात आजाराशी संबंधित विविध तपासण्या अगदी मोफत करण्यात आल्यात.**

स्व.डॉ.कॉ.शा.तिडके माजी आमदार आकोट यांच्या स्मृतीदिनानिमित्त स्व.डॉ.का.शा.तिडके स्मृती प्रतिष्ठान व गोदावरी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हिवरखेडा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात सकाळी १० वाजता शिबिरास सुरुवात झाली. हृदयविकाराच्या निदानासाठी आवश्यक असलेली टू डी इको तपासणी अगदी मोफत करण्यात आली. याशिवाय ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणीही कण्यात आली. याशिवाय डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली.


या तपासणी शिबिराचा रुग्णांना लाभ झाला असून काही



रुग्णांना कान, नाकाशी संबंधित शस्त्रक्रिया तसेच अन्य आजारांवर उपचारासाठी रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे. महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहे. रुग्णालयात येण्यासाठी रुग्णांसाठी गोदावरी फाऊंडेशनतर्फे वाहन व्यवस्थाही करण्यात आली आहे.

# वाकटुकी-महाआरोग्य तपासणी शिबीर

**वाकटुकी - ग्रामपंचायत कार्यालयाच्या पुढाकाराने आणि गोदावरी फाऊंडेशनच्या सहकार्याने सोमवार, १४ रोजी वाकटुकी येथे महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले आहे.**



यावेळी डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील मेडिसीन निवासी डॉ.दिनेश, सर्जरीचे डॉ.अमेय लोखंडे, डोळ्यांचे डॉ.आशुतोष यांनी रुग्णांच्या शंकेचे निरसन केले. शिबिरात ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणीसह कान-नाक-घसा विकार, नेत्रविकार, स्त्रीयांच्या मासिक पाळी, वंध्यत्व, गर्भपिशवी विकार, हृदयविकार आदि आजारांची तज्ञांद्वारे तपासणी करण्यात आली. अधिक माहितीसाठी सरपंच भागाबाई पाटील, रविंद्र पाटील, उपसरपंच निवृत्ती सोनवणे, संदिप पाटील, महेश्वरी पाटील, संजू कोळी, रेखा पाटील, पंढरीनाथ कोळी यांनी शिबिरास भेट दिली.

## दहिदुले-आरोग्य शिबिर उत्साहात

**दहिदुले - ग्रामपंचायत कार्यालय व गोदावरी फाऊंडेशनतर्फे सोमवार, १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते २ या वेळेत महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे.**

जिल्हा परिषद येथील शाळेत आयोजित शाळेत मोफत ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणीसह कान-नाक-घसा विकार, नेत्रविकार, स्त्रीयांच्या मासिक पाळी, वंध्यत्व, गर्भपिशवी विकार, हृदयविकार आदि आजारांची तज्ञांद्वारे तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील निवासी डॉ.अब्दुल्ला, डॉ. शिफा, शेरेझर यांनी तपासणी केली. शिबिरासाठी गोकुळ पाटील, सुदर्शन पाटील, दिलावर पिंजारी, राहूल तायडे यांनी परिश्रम घेतले.



# संक्षिप्त




## डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ओटी निर्जंतूक प्रक्रियेवर कार्यशाळा

**जळगाव** - डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मुख्य ऑपरेशन थिएटरच्या लॉबीमध्ये 'ओटी निर्जंतुक प्रक्रिया (षेससळपस) व त्यासाठी वापरण्यात येणारे लिक्विड (वळीळपषशर्लीरपी ) कसे वापरावे' यावर शुक्रवार दि.१८ नोव्हेंबर रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

ही कार्यशाळा डिपार्टमेंट ऑफ मायक्रोबायोलॉजी एचआयसीसीअंतर्गत आयोजित केली. एचआयसीसी म्हणजे हॉस्पिटल इन्फेक्शन कंट्रोल कमिटी ही समिती हॉस्पिटलमध्ये विस्थापित होणारे विषाणू व जिवाणूंचा प्रादुर्भाव कसा रोखावा याबाबत मार्गदर्शन करते. एचआयसी समिती ही गेल्या पाच वर्षापासून हॉस्पिटलमध्ये सदैव कार्यरत आहे. यावेळी मुंबई हून आलेले मायक्रोजेन कंपनीचे मनोज सिंग (demonstrator)



व डॉ.कैलास वाघ (विभागप्रमुख, मायक्रोबायोलॉजी) यांनी उपस्थीत नर्सिंग स्टाफ व ओटी इंचार्ज, डॉक्टर्स व इंटर्न्स यांना मार्गदर्शन केले. ओटी कशी निर्जंतुक करावी ह्याचे प्रात्यक्षिक करुन घेतले.

कार्यशाळा आयोजित करण्यास डॉ.उल्हास पाटील महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.एस.आर्विकर, प्रशासकीय अधिकारी प्रमोद भिरुड यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी मायक्रोबायोलॉजी विभागाचे विभागप्रमुख डॉ.कैलास वाघ, सहाय्यक डॉ.प्रशांत गुडेती, मि भवानी वर्मा, मि बिटोपन दास, ओटी मॅनेजर निखील चौधरी, ओटी इंचार्ज दिप्ती राऊत या सर्वांनी परिश्रम घेतले.

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी अक्षरमुद्रा प्रिंटर्स, प्लॉट नं.६, कलेक्टर बंगल्याच्या बाजूला, साने गुरूजी कॉलनी, जळगांव येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com(अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# गोदावरी लक्ष्मी को-ऑप बँकेची अध्यक्षपदी डॉ.उल्हास पाटील बिनविरोध

## उपाध्यक्षपदी सोनू भंगाळे यांची एकमताने निवड

**जळगाव - गोदावरी लक्ष्मी को ऑपरेटिव्ह बँकेची सन २०२२-२७ या वर्षासाठी असलेली अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाची निवडणूक आज मंगळवार, दि.१५ नोव्हेंबर रोजी बिनवरोध झाली. यात अध्यक्षपदी डॉ.उल्हास वासुदेव पाटील तर उपाध्यक्षपदी सोनू गोमा भंगाळे यांची एकमताने निवड झाली.**



याप्रसंगी संचालक मंडळातील सुभाष वासुदेव पाटील, लिलाधर विश्वनाथ चौधरी, शालिग्राम देवाजी चौधरी, चंद्रकुमार निंबा चौधरी, डॉ.संपत बारसु वानखेडे, सुरेश प्रेमचंद्र झोपे, राजेंद्र टिकाराम कुरकरे, सौ.आशा रघुनाथ तळेले, सौ.यमुनाबाई यादव महाजन, हरिष नामदेव फालक, सौ.संगिता नितीन चौधरी, राजेंद्र शिवराम महाजन यांची उपस्थीती होती.

सर्वानुमते ही निवड बिनविरोध झाली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कि.द.पाटील, व्यवस्थापकीय संचालक अशोक महाजन, राजेश महाजन व प्रशांत धमके यांनी काम पाहिले.

## गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे बालदिन उत्साहात

**जळगाव - बालदिन साजरा करण्यामागचा उद्देश पंडित नेहरूंना आदरांजली अर्पण करणे हा आहे. लहान मुलांच्या लाडक्या चाचा नेहरूंना आदरांजली म्हणून त्यांच्या जन्मदिनी १४ नोव्हेंबरला भारतात बालदिन साजरा करण्यात येतो. गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये त्या अनुषंगाने १४ नोव्हेंबर २०२२ या दिवशी बालदिन साजरा करण्यात आला.**



याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, महाविद्यालयाचे अधिष्ठाता प्रा. हेमंत इंगळे, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. या प्रसंगी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी संजना नेमाडे, दिव्या महाजन व सानिका राजकुळे यांनी जवाहरलाल नेहरू यांच्या बद्दल व १४ नोव्हेंबर या दिवसाबद्दल त्यांचे मनोगत मांडले. तसेच महाविद्यालयाच्या प्रा.दिपाली पाटील यांनी बाल दिनाचा इतिहास व पंडित जवाहरलाल नेहरू यांचे लहान मुलांवर असलेले विशेष प्रेम याबद्दल सांगितले.बालदिन साजरा करताना आपण अर्थातच चाचा नेहरूंचे विचार समजून घ्यायला हवेत. मुला मुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलविण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधीही मोठ्या प्रमाणात मिळाल्या पाहिजेत. अशा आनंदी वातावरणात महाविद्यालयामध्ये बालदिन साजरा करण्यात आला.

## भुसावळ येथील डॉ.उल्हास पाटील स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा




**भुसावळ - गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी १४ नोव्हेंबर हा सर्वात आनंदाचा आणि मजेशीर दिवस असतो. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका अनघा पाटील यांनी चाचा नेहरूंना आदरांजली वाहून दीपप्रज्वलन करून झाली.**

हा दिवस आपल्या देशाप्रती आणि वृद्धांप्रती असलेल्या जबाबदार्‍या, देशभक्ती आणि प्रेम यांचे महत्त्व लक्षात आणून देतो. शिक्षकांनी रंगीत नृत्य आणि गाणी आयोजित केली आणि सादर केली. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांनी शपथ घेऊन व आभार प्रदर्शन करून

## गोदावरी अभियांत्रिकीत कौशल्य विकास कार्यशाळा उत्साहात

**जळगाव - गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थी संघटनेने** (EESA) **दि. १५ रोजी कौशल्य विकास कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यक्रमात विविध प्रकारच्या नवीन विद्युत तंत्रज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली.** Electrical vehicle, Embedded systems,smart grid, wireless wearable technolog हे ह्यातील प्रमुख मुद्दे होते.



कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, अधिष्ठाता प्रा. हेमंत इंगळे, विभाग प्रमुख प्रा. अतुल बऱ्हाटे, सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.सदरील प्रश्नमंजुषे मध्ये प्रथम क्रमांक अशोक अत्तरदे, व्दितीय क्रमांक आकाश राठोड व तृतीय क्रमांक रोहीत मंडपे या विद्यार्थ्यांनी मिळविला. प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांच्या हस्ते विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. डॉ. विजयकुमार पाटील यांनी त्यांच्या मार्गदर्शनात विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले, तसेच नवनवीन विद्युत तंत्रज्ञान अवगत करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रमात ६०-७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनल पाटील व अश्विनी भावसार यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा.अतुल बऱ्हाटे यांच्या मार्गदर्शनाखाली

## पिंपळगाव (हरे.) रक्तदान शिबिरात ५१ दात्यांचे रक्तदान

**पाचोरा - तालुक्यातील पिंपळगाव हरे येथे उष:काल प्रतिष्ठान, भारतीय जनता पार्टी व महाराष्ट्र मोबाईल शॉप यांच्या संयुक्त विद्यमाने युवाहृदयसम्राट अमोल शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त उष:काल पॉलिक्लिनीक, विठ्ठलपुरा चौक बुधवार, १६ नोव्हेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात ५१ दात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले.**



शिबिराप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य मधुभाऊ काटे, अमोल शिंदे, ग्राम विकास मंडळ अध्यक्ष प्रकाश बाजीराव पाटील, ग्राम विकास मंडळ माजी अध्यक्ष देविदास महाजन यांची उपस्थीती होती.

डॉ.उल्हास पाटील रक्त पेढीच्या डॉ. प्रियंका कांबळ, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील, अमोल चौधरी, सैय्यद शेख, उषाकाल पॉलिक्लिनिक संचालक डॉ.शांतीलाल तेली, डॉ.अल्केश तेली व वार्ड बॉय चेतन व्यवहारे, हर्षल भोई, भूषण भोई, मुकेश हटकर, अक्षय जाधव यांनी परिश्रम घेतले.

यावेळी सरपंच सुमनबाई सावळे, विनोद महाजन भाजपा शहर अध्यक्ष शंकर मंडावरे, माजी सभापती बन्सीलाल पाटील, भाजपा तालुका सरचिटणीस गोविंद शेलार, उपसरपंच शिंदाड दशरथ पाटील, नरेंद्र पाटील, स्वप्नील पाटील, तालिब शेख, वसंत गीते सुदाम तेली, रमेश आगवाल, दिपक झेरवाल, बंटी राठोड, विजय काळे, हमीद शेख, परेश प्रशांत जैन, वृषभ जैन, पाटील, वसंत गीते आदिंची उपस्थीती होती.

## तालुकास्तरीय आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत सावदा स्कूलचे यश

**सावदा : डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सी.बी.एस.ई. स्कूल सावदा येथे १४ नोव्हेंबर रोजी तालुकास्तरीय आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या प्राचार्य भारती महाजन यांनी मायक्रोविजन स्कूल रावेर येथील क्रीडा शिक्षक किरण दुबे व निलेश मोरे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पर दोन शब्द सांगितले आणि नंतर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष खेळाला सुरुवात झाली. खेळाच्या नियमानुसार दोघ संघांना खेळाचे नियम समजावण्यात आले आणि त्यांना खेळण्यासाठी सूचना दिली गेली आणि फुटबॉल स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेमध्ये डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल सावदा येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. ही स्पर्धा मायक्रो विजन स्कूल रावेर येथील विद्यार्थी आणि डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल सावदा येथील विद्यार्थी अशा दोन संघांमध्ये घेण्यात आली.



मायक्रो व्हिजन स्कूल रावेर येथील विद्यार्थी पराभूत झाले. अशा प्रकारे अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात ही स्पर्धा झाली. सूत्रसंचालन शिक्षिका उषा तायडे यांनी केले. या स्पर्धेसाठी असलम अली, वसीम शहा आणि सोनवणे या क्रीडा शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात ही स्पर्धा

## संपादकीय...

# समाज माध्यमांवरील नियंत्रण

समाज माध्यमांमुळे सर्वसामान्यांना अभिव्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे यात शंका नाही. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक अशा विविध क्षेत्रांतील घटना घडामोडींबद्दल प्रत्येकाचे स्वतःचे म्हणून एक आकलन असू शकते. ते त्यांना मांडता येणे किंवा त्याद्वारे इतरांवर प्रभाव टाकणे समाज माध्यमांमुळे शक्य होते. त्यामुळे समाज माध्यमांवर विविध प्रकारच्या मतप्रवाहांचा कोलाहल असणे स्वाभाविकच. लोकशाहीतच मतभिन्नता स्वागतार्हच असते. म्हणूनच समाज माध्यमे लोकशाहीला पूरकच ठरतात. मात्र, आपले मत इतरांवर लादण्यासाठी खरे आणि खोट्याचे बेमालूम मिश्रण करणाऱ्यांमुळे, द्वेष फैलावून समाजात फूट पाडणाऱ्यांमुळे आणि बीभत्स धंदेवाईक वृत्ती असलेल्यांमुळे समाज माध्यमे अशांतता निर्माण करण्याला, ऐक्याला तडे देण्यालाही कारणीभूत ठरत आहेत. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय हितसंबंधी मंडळींच्या कारवायांमुळे ही नवी माध्यमे समाजासाठी आणि देशासाठी धोकादायक ठरण्याची भीती आहे. त्यांच्या नियमनाची आवश्यकता भासते, ती यासाठी. याबाबत वेळोवळी कायदे केले गेले. खुद्द समाज माध्यमांनाच अधिक उत्तरदायी बनविण्यासाठी प्रयत्न झाले. कुप्रवृत्तींकडून आपला गैरवापर होणार नाही यासाठी तसेच खातेधारकांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी या माध्यमांना अंतर्गत व्यवस्था करणेही भाग पाडले गेले. समाजात द्वेष पसरविणाऱ्यांपासून समाज विघातक कारवायांना उद्युक्त करणाऱ्यांपर्यंत सर्व अपप्रवृत्तींना रोखण्याचा प्रयत्न झाला खरा परंतु अपप्रवृत्ती काही कमी झाल्या नाहीत. या माध्यमांचा गैरवापर कायमच राहिला आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्यात नव्याने दुरुस्ती करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय होण्याला ही पार्श्वभूमी आहे. या कायद्यातील दुरुस्तीनुसार, तक्रारींच्या निराकरणासाठी विविध प्रकारच्या समित्या (जीएसी) पुढील तीन महिन्यांत स्थापल्या जातील. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू ट्यूब आदी विविध समाज माध्यमांबद्दल या समित्यांकडे थेट तक्रार करण्यात येणार आहे. एक अध्यक्ष आणि दोन स्थायी सदस्य यांचा समावेश असलेल्या समित्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घेऊन निकाल देणार आहेत. त्यांचे पालन करणे संबंधित माध्यमांना बंधनकारक असेल. द्वेषमूलक, प्रक्षोभक किंवा समाजात फूट पाडण्यासाठी समाज माध्यमांचा वापर करणाऱ्यांचे खातेही बंद करण्याचा आदेश या समित्या देऊ शकतात. अशा रीतीने समाज माध्यमांवर सरकारचे थेट नियंत्रण असू शकेल. समाज माध्यमांचा वापर दहशतवादी आणि मूलतत्त्ववादी करीत असल्याकडे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीही लक्ष वेधले आहे. अनेक दहशतवादी संघटना प्रक्षोभक आशय ‘टूल किट’प्रमाणे वापरत असल्याकडे त्यांनी अंगुलिनिर्देश केला आहे. आपल्याले हवे तसे कथन निर्माण करण्यासाठी समाज माध्यमांवर काही विचारधारा, चळवळी आणि पक्ष ‘टूल किट’चा वापर करीत असल्याकडे यापूर्वीही लक्ष वेधले गेले आहे. जयशंकर यांनी दहशतवाद आणि ‘टूल किट’ यांचा सहबंधही उलगडून दाखवला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने समित्यांमार्फत दंडात्मक कारवाईसाठी पुढे सरसारवले आहे. सत्ताधारी पक्ष आपल्या सोयीने कारवाई करणार, असा अर्थ कोणी काढत असेल, तर तो चुकीचा ठरविण्याची जबाबदारी सरकारची आणि तिने नेमलेल्या समित्यांची असेल. लवकरच या समित्या स्थापल्या जातील, त्यांवर कोणाची वर्णी लागते, तक्रारींच्या निवारणासाठी कशी पावले पडतात आणि कोणावर दंडात्मक कारवाई होते यांतून सरकारचा हेतू स्पष्ट होईल.

# आला हिवाळा; संधिवाताला घाला आळा





हिवाळ्यातील शुष्क वातावरण आणि अतिशय थंडी, यामुळे वात रोग हटकून जोर काढतात. संधिवाताचा त्रास असलेल्या रुग्णांना थंडीच्या दिवसांमध्ये अधिक त्रास होतो. संधिवाताचा त्रास असलेल्यांना हिवाळा सुरू झाल्यावर काहीजणांचे मुख्यत्वे सांधे खूप दुखू लागतात. त्यामुळे हिवाळ्याची सुरुवात होण्यापूर्वीच काळजी घ्यायला हवी. प्रत्येक वर्षी थंडीची तीव्रता किती असेल हे सांगता येत नाही. त्यामुळे हिवाळा ऋतु सुरू होण्यापूर्वीच ही काळजी घेतली, औषधोपचार व्यवस्थित घेतले तर हा त्रास कमी होतो. 'रुमॅटिक' तसेच 'गाऊट' या प्रकारच्या संधिवाताचा त्रास हा थंडीमध्ये वाढतो. त्यामुळे त्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करावे लागतात.

काही आजारांमध्ये रक्त तपासण्याही कराव्या लागतात. त्यामध्ये संधिवाताचा त्रास किती आहे हे लक्षात येते. या रक्त तपासण्या नियमित प्रकारे केल्या तर आजार नियंत्रणात राहतो. पूर्वी 'रुमॅटिक फिव्हर विथ आर्थ्रायटिस' हा संधिवाताचा प्रकार तरुणांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येत असे. त्याचा प्रभाव हा हृदयाच्या आरोग्यावरही व्हायचा, तसेच तो सांध्यांवरही परिणाम करायचा. स्ट्रेप्टोकोकस नावाच्या जीवाणूच्या प्रभावामुळे हा आजार होत असे. आता मात्र हे नियंत्रणात आले आहे.

पूर्वीपेक्षा तरुणांमध्ये हे प्रमाण कमी झाले आहे. युरिक ॲसिडचे शरीरामध्ये प्रमाण अधिक झाले, की ते सांध्यांमध्ये साचते. हे युरिक ॲसिडचे प्रमाण अधिक असणाऱ्यांनी मासांहार कमी करायला हवा, असाही सल्ला द्यावा लागतो. पूर्वी ज्या ठिकाणी मार लागलेला असतो, त्या बाजूला रक्तपुरवठा कमी होतो, वेदना निर्माण होणारे घटक जेथे असतात त्याचा निचरा व्हायला हवा, तो होत नसल्यामुळे या वेदनांचा ठणका वाढत जातो. थंडीमध्ये अनेकदा मार लागलेल्या ठिकाणी रक्तपुरवठा कमी होतो, त्यामुळे काही वेदना पुन्हा उफाळून येतात.



### लक्षणे

संधिवातात सांध्यांमध्ये सूज येते, कधी सांध्यामध्ये संकोच झालेला आढळतो, कधी सांधे जखडल्यासारखे वाटायला लागतात किंवा काही सांध्यांमध्ये पीळ येणे अशा प्रकारची वेदना होते. बोटांच्या पेरांमध्ये वेदना होतात. सांध्यांच्या हालचालींमध्ये कुठेतरी फरक पडला आहे, असे जाणवते. त्याची योग्य काळजी घेतली नाही तर ही लक्षणे अधिक तीव्र होऊ लागतात.

### अशी घ्यावी काळजी

- थंडीपासून बचाव करण्यासाठी गरम कपडे घालावेत.
- थंड पाणी, कोल्ड ड्रिंक्सचे सेवन करू नये.
- कोमट पाणी प्यावे.
- आहार ताजा, उष्ण असावा.
- बाहेरचे अन्नपदार्थ खाऊ नयेत
- नियमित व्यायाम करावा
- झोपेतून अचानक उठू नये.

### शस्त्रक्रियांसाठी योग्य

हिवाळा हा ऋतू शस्त्रक्रियेसाठी योग्य असतो. उष्म्याच्या दिवसांमध्ये संसर्ग वाढतो, त्यामुळे शस्त्रक्रिया केल्यानंतर संसर्ग होण्याचा धोका असतो. मात्र थंडीमध्ये हा धोका अतिशय कमी असतो. रुग्णाचा आहारही पोषक असतो, त्यामुळे शस्त्रक्रिया केल्यानंतर जखम भरून येण्याची शक्यताही अधिक असते.

## प्राचीन खान्देश-१

## खानदेशातील अश्मयुगीन स्थळे

# महाराष्ट्र आणि खानदेश

### प्रकरण ३ : विकास आणि नैसर्गिक स्थान

### अजिंठा लेणी

अजिंठा लेणी ही विविध कालखंडात खोदली आहे. इथले सगळ्यात जुने लेणे इ. स.पू. २०० वर्षापूर्वी खोदले गेले तर सर्वात अलीकडचे साधारण ५ व्या ते ६ व्या शतकात आहे. सातवाहन, गुप्त आणि वाकाटकांच्या कारकिर्दीत येथली लेणी खोदली गेली. सुरुवातीच्या काळात खोदलेली लेणी ही हीनयानकाळातली असून त्यात साधे चैत्यगृह आणि विहार आहेत तर नंतरच्या काळात खोदलेली महायानपंथीय लेणी शिल्पांकृत स्तूप आणि भव्य विहारांनी सजलेली आहेत. अजिंठ्याची जगप्रसिद्ध चित्रे असलेले विहार महायानकाळात खोदले गेले, साहजिकच ती लेणी ह्या समूहाच्या दोन्ही टोकांना आहेत तर मधली लेणी ही सर्वात प्राचीन आहेत. म्हणजेच ९, १० क्रमांकाची लेणी ही अतीप्राचीन तर १, २ आणि २५, २६ हे सर्वात अलीकडील आहे. यातले १ व २ क्रमांकाची लेणी हे विहार असून यात पद्मपाणी, वज्रपाणी, मैत्रेय आदी बोधिसत्वांची अतिशय देखणी चित्रे तसेच जातक कथांतील दृश्ये रंगवलेली आहेत तर २५, २६ क्रमांकाच्या लेण्यांमध्ये बुद्धाच्या जीवनातील प्रसंग मूर्तीरूपात कोरलेले आहेत. अजिंठा लेणीसमूहात एकूण ४ चैत्यगृह तर उरलेले सर्व विहार आहेत. कड्याच्या वरच्या भागात अजून एक चैत्यगृह निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेलेला दिसतो पण फक्त अश्वनालाकृती वातायन तयार करून इतर काम अर्धवट सोडलेले दिसते.




अजिंठ्यातील बहुतेक विहार हे महायानकाळातील असल्याने त्यामध्ये बुद्धमूर्ती कोरलेल्या आहेत. ओसरी, स्तंभयुक्त सभामंडप आणि आतमध्ये गर्भगृहात सिंहासनारूढ अथवा कमळपुष्पावर विराजमान झालेली बुद्धमूर्ती अशी यांची सर्वसाधारण रचना. एका परीने मंदिरनिर्माणाची ही पहिली पायरीच आहे. इथल्या पहिल्या व दुसर्या क्रमांच्या विहारात अजिंठ्यातली जगप्रसिद्ध चित्रे रंगवलेली आहेत.

### शोध

२८ एप्रिल १८५९ साली जॉन स्मीथ या ब्रिटिश सैनिकी अधिकारीला सापडले. पहिला टप्प्यांत थेरवादी प्रभाव जाणवतो. दोन कालखंड आहेत. इ.स.पूर्व १५० ते २०० व पाचव्या शतकानंतर पाचव्या ते सातव्या शतकापर्यंत तेथील विहारात बौध्द भिक्खूचा वावर होता. दहा नंबरच्या लेणीतील लेखावरून कालखंड काढता येतो. नंतरच्या काळात स्तुपाची उंची वाढत गेली. प्रवेशद्वार आणि प्रदक्षिणा पथ मार्ग तयार झाला.अजिंठा नंबर ९ मध्ये ऐतिहासिक प्रयोग केला आहे. चैत्यगृह आयताकृती केले आहे व स्तंभ चापाकार आहेत.



सौ. सरला भिरुड
संशोधक व लेखिका

(क्रमशः)

# आला थंडीचा महिना; डॉक्टरविना आजार जाईना



**जळगाव** – बदलत्या ऋतूत आहे. कारण, ऋतू बदलल्याने तापमानात बरेच बदल होत आहाराने काही वेळात बरे होण्यासाठी बराच वेळ डॉक्टरांकडे आणि हिवाळयाच्या होते ज्यामध्ये ब्रोकायटिस, जळजळ यांचा थंडीतील बहुतेक इन्फेक्शनमुळे किरकोळ आजार होणे सामान्य बाब आजूबाजूचे वातावरण आणि असतात. काही आजार योग्य स्वतःच बरे होतात आणि काही लागतो, ज्यामध्ये अनेक वेळा हॉस्पिटलला जावे लागते. हंगामात तापमान कमी सर्दी, खोकला, फ्लू, कोरडेपणा आणि त्वचेची समावेश होतो. आजार व्हायरल होतात. आजारांवर कोणाचेही नियंत्रण नाही, पण काही खबरदारी घेऊन स्वतःचे आणि कुटुंबाचे रक्षण करू शकता.

### –प्रतिबंधात्मक उपाय–

- ✻ उबदार कपडे नीट परिधान करा.
- ✻ खोकताना किंवा शिंकताना आपले तोंड झाकून ठेवा आणि वेळोवेळी आपले हात स्वच्छ करा किंवा धुवा.
- ✻ शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्या साठी चांगले अन्न खा.
- ✻ कोरडेपणा टाळण्यासाठी त्वचेला मॉइश्चरायझ करा.

# भारतात भेट देण्यासाठी पॉकेट फ्रेंडली ठिकाणे

### अलेप्पी - पूर्वेकडील व्हेनिस

अलेप्पी, पूर्वेकडील व्हेनिस, हिरवेगार ग्रामीण भाग, तलाव आणि जलमार्ग यासाठी प्रसिद्ध आहे. सध्याच्या हाऊसबोट्समध्ये आळशीपणे फिरण्यासाठी, स्वादिष्ट नारळ–लेस सीफूडचा नमुना घेण्यासाठी आणि भारतातील सर्वात स्वस्त सोलो ट्रिपचा आनंद घेण्यासाठी हे सर्वोत्तम ठिकाण आहे. अलेप्पी हे भारतातील कमी बजेटच्या सहलींसाठी सर्वात सुंदर ठिकाणांपैकी एक आहे.



- ✻ **मुक्कामाचा आदर्श कालावधी:** २ रात्री/३ दिवस
- ✻ **भेट देण्यासाठी सर्वोत्तम वेळ:** ऑक्टोबर ते फेब्रुवारी
- ✻ **सरासरी किंमत – मुक्काम:** INR 350 - INR ८०० प्रति रात्र
- ✻ जेवण: INR ७०० प्रति जेवण.
- ✻ **हाऊसबोट्स:** १ BHK साठी दररोज INR ६००० पासून प्रारंभ करा आणि त्यात तीन जेवणांचा समावेश आहे, म्हणून शक्य असल्यास मित्रांसह वाटून घ्या.

**अलेप्पीमध्ये भेट देण्याची ठिकाणे:** अलेप्पीमध्ये करण्यासारख्या गोष्टी:

- ✻ अलप्पुझा बीच हाऊसबोटीत रहा
- ✻ वेंबनाड तलाव रात्री फिरायला जा
- ✻ पाथीरमनल बेट
- ✻ पाँडिचेरी – फ्रेंच शहर

भारतातील काही स्वस्त सहलींद्वारे तुम्हाला फ्रेंच अनुभव मिळू शकत असताना हजारो लोकांची मदत का? पाँडिचेरीला भारतात कमी बजेटच्या सहलींसह, तुम्हाला फ्रेंच फ्लेअर भारतातच मिळू शकेल. दिवसा खड्डेमय रस्त्यांवर चाला आणि संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावरील असंख्य कॅफेमध्ये पाय ठेवा. आणि हो, आजूबाजूचे फ्रेंच खाद्यपदार्थ वापरून पहायला विसरू नका.

**आदर्श कालावधी:** २ रात्री/३ दिवस

**भेट देण्यासाठी सर्वोत्तम वेळ:** ऑक्टोबर ते मार्च

**सरासरी किंमत: चेन्नई ते पाँडेचेरी आणि परतीचा बस प्रवास:** INR ५००

**मुक्काम:** आरामदायी कॉटेज मुक्काम INR ३०० किंवा बजेट हॉटेल्स INR ५००

**अन्न:** दोनसाठी INR २००-३०० पासून काही भारतीयीकृत फ्रेंच पाककृती वापरून पहा

**पाँडिचेरीमध्ये भेट देण्याची ठिकाणे:** पाँडिचेरीमध्ये करण्यासारख्या गोष्टी:

- ✻ नंदनवन समुद्रकिनारा मासेमारी
- ✻ अरबिंदो आश्रम सायकलिंग सहल
- ✻ पाँडी बाजारात ऑरोविल शॉपिंग

रोहित अग्रवाल,
सहा.प्राध्यापक,
हरीभाऊ जावळे इन्स्टीट्यूट ऑफ
हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी


साप्ताहिक
गोदावरी परिवार

# देवस्थान :- कुबेर भंडार (गुजरात)

कुबेर भंडार मंदिर, जिथे भगवान शिवाचे स्वयंप्रकाशित शिवलिंग आहे, हे डभोई तालुक्यातील करनाळी गावात नर्मदा नदीच्या काठावर सुमारे ८०० फूट उंचीवर आहे. हे मंदिर सुमारे २५०० वर्षे जुने मंदिर आहे. येथे भगवान शंकराच्या शिवलिंगाशिवाय गणपती, महाकाली, हनुमान आणि रणछोदराय यांचीही मंदिरे आहेत. अमावस्येच्या दिवशी ५ लाखांहून अधिक लोक कुबेर भंडारी दादांचे आशीर्वाद घेण्यासाठी येतात. अमावस्येच्या दिवशी रात्री १२ वाजल्यापासून दादांचे दर्शन सुरू होते. ४ ते ५ तास २ किमी पेक्षा जास्त रांगेत उभे राहिल्यानंतर कुबेर भंडार दादा दिसतात. येथे भाविकांची प्रत्येक इच्छा पूर्ण होते आणि निपुत्रिक महिलांनाही अपत्यप्राप्ती होते, म्हणूनच अमावस्येच्या दिवशी लाखो लोक दर्शनासाठी येतात. मंदिराच्या डाव्या बाजूला नर्मदा नदीचा किनारा आहे, तो अतिशय सुंदर दिसतो. अमावस्येच्या दिवशी दर्शन आणि नर्मदा स्नान करून लोक धन्य होतात. कुबेर नर्मदा नदीच्या तीरावर करनाली येथे आले आणि भगवान शंकराची तपश्चर्या (ध्यान) करू लागले आणि येथे महाकाली मातेची प्रार्थना केली. भगवान शिव त्यांच्या भक्तीवर प्रसन्न झाले आणि येथे प्रकट झाले, त्यांना देवतांच्या संपत्तीचे रक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली. म्हणूनच त्याला संपत्तीची देवता कुबेर भंडार असे म्हटले जाते. भगवान शिवाने त्यांना आपल्यासोबत स्थान दिले आणि तेव्हापासून या ठिकाणी भूमी प्रकट झाल्यापासून हे स्थान लोकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. करनालीच्या समोरच्या काठावर निळकंठधाम स्वामीनारायण मंदिर आणि सहजानंद ब्रह्मांड अतिशय सुंदर दिसते. तुम्ही तिथे फेरीने सुमारे १५ मिनिटांत पोहोचू शकता.

### कसे जाल

✻ **हवाई मार्गे:** सर्वात जवळचे विमानतळ वडोदरा सुमारे ६० किमी अंतरावर आहे, तेथून तुम्ही टॅक्सी किंवा बसने पोहोचू शकता. ✻ **रेल्वे मार्गे:** सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन वडोदरा सुमारे ६० किमी अंतरावर आहे, तेथून तुम्ही टॅक्सी किंवा बसने पोहोचू शकता. ✻ **मार्गे:** वडोदराहून तुम्ही मंदिरापर्यंत जाण्यासाठी अनेक रिक्षा आणि टॅक्सी घेऊ शकता. अमावस्येच्या दिवशी, वडोदरा ते कर्नाळी पर्यंत विशेष परिवहन बसेसची व्यवस्था केली जाते, जेणेकरून ते सहज पोहोचू शकेल. ✻ **बोटीच्या मधोमध :** चाणोद, पोईचा येथून बोटीने कुबेर भंडारीच्या मंदिरातही जाता येते.



## सुविचार

या जगात तुम्ही ज्याच्यावर सर्वात जास्त प्रेम कराल तीच व्यक्ती तुम्हाला सर्वात जास्त रडवेल.

## संत तुकाराम सार्थ गाथा



### अभंग क्र. ४७


**पवित्र सोंवळीं ।**
**एक तींच भूमंडळीं ।।१।।**
**ज्यांचा आवडता देव ।**
**अखंडित प्रेमभाव ।।ध्रु.।।**
**तींच भाग्यवंतें ।**
**सरतीं पुरतीं धनवित्तें ।।२।।**
**तुका म्हणे देवा ।**
**त्यांची केल्या पावे सेवा ।।३।।**

**अर्थ**

या भुमंडळी संतसज्जनच एक पवित्र, शुद्ध आहेत.त्यांच्या मनात फक्त परमेश्वराविषयीच प्रेम, भक्ति असते.धनद्रव्याने समृद्ध, बुद्धिने तल्लख असे ते संत या जगात भाग्यवंत आहेत .तुकाराम महाराज म्हणतात अशा संतसज्जनाची सेवा केली तर ती देवाला पावते.

## सप्ताहातील दिनविशेष

दि. २५ जागतिक पर्यावरण संवर्धन दिन
दि. २६ हुंडाबळी दिन
-०-०-






## पाककृती

### भाज्यांचे पौष्टिक गरमागरम सूप

**साहित्य –** फ्लॉवर – कोबी – १ वाटी, फरसबी – १ वाटी, हिरवा किंवा लाल भोपळा – १ वाटी, टोमॅटो – १ , बीट – गाजर – १ वाटी , कॉर्न फ्लोअर – २ चमचे , मीरपूड – पाव चमचा , मीठ – चवीपुरते, आलं-लसूण पेस्ट – अर्धा चमचा, तेल – अर्धा चमचा



**कृती –** घरात उपलब्ध असतील त्या सगळ्या भाज्या स्वच्छ धुवून बारीक चिरुन घ्यायच्या.या भाज्या कुकरच्या भांड्यात घालून त्यात पाणी घालून २ शिट्ट्या काढून घ्यायच्या. गॅसवर कढई ठेवून त्यामध्ये तेल घालून आलं-लसूण पेस्ट घालावी आणि ती थोडी लालसर होऊ द्यावी. यात शिजलेल्या भाज्या पाण्यासहीत घालाव्यात. एका वाटीत कॉर्न फ्लोअर घेऊन त्यात पाणी घालून ते चांगले मिसळून घ्यावे आणि कढईत घालावे. यामुळे घट्टपणा येण्यास मदत होते. सूप चांगले शिजत आले की त्यामध्ये मीठ आणि मिरपूड घालावी. चांगले उकळल्यानंतर गरमागरम सूप पिण्यास तयार होते. सुपातील भाज्या मिक्सर वर वाटून घेतल्या तरी चालतात, ज्यामुळे अहं मुले, वयोवृद्धांनाहि पिणे सोयीचे होते.

## किचन टिप्स

✻ स्वयंपाकात जर हळद जास्त असेल तर ते अन्न कडू बनवते. हळदीच्या तीव्र चवीमुळे जेवणात वास येऊ लागतो आणि अन्न अजिबात खाल्ले जात नाही. बनवलेल्या पदार्थांत हळद अधिक प्रमाणात घातली गेली असेल तर आपण नाराळाचे दूध घालून संतुलित करु शकता.अनेक पदार्थांमध्ये आंबटपणा यावा म्हणून आमचूर पावडर घातली जाते. तसेच आंबट पावडर हळदीचे स्वाद सुंतलित करण्यासाठी देखील केला जाऊ शकतो. याशिवाय ग्रेव्हीत हळद जास्त पडली असल्यास त्यातून भाजी किंवा पनीर वेगळे करुन त्यात पाणी, मीठ आणि दही मिसळा. याने हळदीचा कडवटपणा कमी होईल. कच्चे बटाटे घालण्याने मीठ आणि हळद संतुलित करण्यास मदत होते. एका कच्च्या बटाट्याचे सहा पीसेस करुन ग्रेव्हीत घालावे आणि ५ मिनिटे मंद आचेवर शिजू द्यावे. बटाटा हळद आणि मीठ अब्सॉर्ब करेल आणि पदार्थ फसणार नाही.

✻ अनेक वेळा कोफ्ता किंवा मंचुरियन बॉल्स वगैरे बनवताना ते मोकळे होतात. अशावेळी तुम्ही जी काही भाजी वापरायची आहे ती किसून घ्या. ती किसल्यावर लगेच त्यात मसाले घालू नका. त्याऐवजी त्यात मीठ घालून १५ मिनिटे ठेवा. यानंतर भाज्यांमध्ये पाणी येईल आणि जे पाणी असेल ते गाळून घ्या आणि त्यानंतर कोफ्ते बनवा.



## पाककृती

### सिताफळ मिल्कशेक

साहित्य – २ सिताफळं, अर्धा ग्लास दूध, २ टेबलस्पून साखर, बदाम- काजू असा सुकामेवा, व्हॅनिला आईस्क्रिम

कृती – सगळ्यात आधी सिताफळाच्या बिया एका चाळणीत काढून सिताफळाचा गर काढून घ्या. हा गर मिक्सरमधून काढून बारीक करून घ्या.बारीक करताना त्यात थोडं दूध आणि साखर घाला. हे मिश्रण एका ग्लासमध्ये ओता. त्यात वरून सिताफळाचा गर आणि २ टेबलस्पून व्हॅनिला आईस्क्रिम टाका. सगळ्यात शेवटी वरून काजू-बदाम, पिस्ता अशा तुमच्या आवडीच्या सुकामेव्याचे काप करून टाका.



## सौंदर्य टिप्स



✻ कडुलिंब हे नैसर्गिकरित्या खूप फायदेशीर आहे. कडुलिंबाची पाने अनेक जणं पाण्यात टाकून अंघोळ करतात. कडुलिंबाची पाने पाण्यात मिसळून अंघोळ केल्याने शरीर ताजेतवाने राहते. सर्वप्रथम १० ते १५ कडुलिंबाची पाने उकळा, नंतर ती आंघोळीच्या पाण्यात मिसळा आणि आंघोळ करा. फ्रेशसह दिवसभरात शरीरातून दुर्गंधी देखील येणार नाही.

✻ लिंबू आम्लयुक्त आहे, त्यामुळे शरीरातील बॅक्टेरिया नष्ट करण्यासाठी ते खूप प्रभावी आहे. अंघोळ करण्यापूर्वी पाण्यात लिंबाचा रस घाला. यामुळे शरीरातील दुर्गंधी दूर होईल. यासोबतच डोक्यातील कोंडा दूर करण्यासाठीही लिंबू उपयुक्त आहे. लिंबुमुळे दिवसभर फ्रेश देखील वाटेल.

स्किन संबंधित समस्यांसाठी
आजच संपर्क साधा
डॉ.दिनेश कुलाळ
८४५९३९४८१३



✻ तुरटीमधील गुणधर्म केवळ नैसर्गिकरीत्या अँटीफंगल आणि अँटीसेप्टिक नाही तर आपल्या शरीराला ताजे ठेवण्यासाठी आणि दुर्गंधी दूर करण्यासाठी देखील खूप प्रभावी आहे. अंघोळ करण्यापूर्वी पाण्यात तुरटीचे थोडे खडे टाका आणि पाण्यात मिसळा. तुरटी मिसळलेल्या पाण्याने आंघोळ केल्याने शरीर ताजेतवाने होते आणि शरीरातून दुर्गंधीही येत नाही.

✻ पाण्यात चंदनाचे तेल मिसळून आंघोळ करण्याचे अनेक फायदे आहेत. यामुळे शरीराची दुर्गंधी तर दूर होतेच पण त्वचेची मॉइश्चरायझर लेव्हलही कायम राहते. नियमित चंदन तेल पाण्यात मिसळून अंघोळ केल्याने त्वचा नेहमी कोमल राहेल.



## परोपकार

### बोधप्रद गोष्ट

एका गावात एक निर्धन मनुष्य राहत होता. परिस्थिती गरीबीची असूनही तो मनाने उदार होता. आपल्या घासातील घास देण्यासही तो कमी पडत नसे. एकदा एका शेठजीकडे तो जेवावयास गेला असताना त्या शेठजीने त्याला पंचपक्कान्नाचे ताट वाढून दिले. ती भरगच्च पदार्थांनी भरलेली थाळी बघून त्या गरीबाला वाटले की यातून किमान तीन माणसांची भूक भागू शकेल. त्याने शेठजीची परवानगी मागितली व त्यातील अन्न त्याने बरोबर घेतले व घराकडे जाण्यास निघाला. रस्त्यात त्याला एक भिकारी भेटला त्याला त्याने खायला दिले. त्यातून उरलेले अन्न घेऊन तो घरी आला, तो जेवायला बसणार इतक्यात एक भिक्षुक या माणसाच्या घरी आला व त्याने त्याला अन्नदान करण्याची विनंती केली. गरीबाने त्याच्यासमोरील ताट त्या भिक्षुकाच्या स्वाधीन केले. त्यानंतर अजून एक अपंग व्यक्ती दाराशी आली त्यानेही या गरीबाकडे अन्न मागितले त्यालाही याने आपल्या थाळीतील अन्न खायला दिले. आता याच्याकडे देण्यासारखे काहीच शिल्लक राहिले नाही तेव्हा याने स्वत:ची भूक भागविण्यासाठी एक भांडेभर पाणी घेतले तर समोरून एक वृद्ध व्यक्ती आली व तिने ते पाणी पिण्यासाठी मागितले. याला आता खाण्यापिण्यासारखे काहीच उरले नाही तरीही ही व्यक्ती समाधानात होती आजचा दिवस आपल्यामुळे किमान चार लोकांना तरी खाण्यापिण्यास मिळाले.

तो ह्याच विचारात असताना तेथे देव प्रगटले व म्हणाले,'मी तुझी परीक्षा घेण्यासाठीच भिकारी, भिक्षुक, अपंग आणि वृद्ध व्यक्तिचे रूप घेतले होते व तुझ्याकडून काही ना काही मिळते का नाही हे पाहिले आणि तु स्वत:चा विचार न करता दुस-याचा जीव जाणून घेतलास व देत राहिलास. आता या पुढे तुला काहीच कमी पडणार नाही असा मी तुला वर देतो. इतके बोलून देव अंतर्धान पावले.

तात्पर्य : देण्यातच खरे सुख लपलेले आहे. कुणाचाही घास हिरावून घेण्यापेक्षा कुणाला तरी एखादा घास देता कसा येईल याचा विचार करणे यातच खरे सुख लपलेले आहे.

साप्ताहिक गोदावरी परिवार

# केक, टोपी, कॅडबरी, ड्रॉईंग साहित्यांनी चिमुकले आनंदले

**जळगाव – १४ नोव्हेंबर या राष्ट्रीय बालदिनाचे औचित्य साधून उपचारार्थ डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात दाखल असलेल्या बालकांसाठी केक कटिंगचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी बालकांना रंगबेरंगी टोप्या, ड्रॉईंग साहित्य, कॅडबरीचे वाटप करुन बालदिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्यात. या सर्व वातावरणामुळे बालकांच्या चेहऱ्यावरुन आनंद ओसंडून वाहत होता.**

गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील बालरोग विभागातर्फे सोमवार, १४ नोव्हेंबर रोजी देशाचे माजी पंतप्रधान स्व.पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त असलेल्या बालदिनानिमित्त बालकांसाठी उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी पीआयसीयू विभागात फुग्यांची सजावट करण्यात आली असून लहानग्यांना आकर्षण असलेला केक देखील आणला होता. प्रत्येक बाळाला टोपी घालून त्यांच्याहस्ते केक कापण्यात आला. तसेच कॅडबरीचेही वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे बालकांच्या चेहर्यावर हसू फुलले, नातेवाईकांनी देखील उपक्रमाचे कौतुक केले.



याप्रसंगी बालरोग विभागातील प्रो.डॉ. अनंत बेंडाळे, डॉ.उमाकांत अणेकर, डॉ. सुयोग तन्नीरवार, डॉ.विक्रांत देशमुख, डॉ. धवलकुमार खडके यांच्यासह निवासी डॉ.प्रज्ञिल रांगणेकर, डॉ.सुरुची शुक्ला, डॉ. रोहिणी देशमुख, डॉ.दर्शन राठी, डॉ.भारती झोपे, हिरामण धनगर यांच्यासह नर्सिंग स्टाफची उपस्थीती होती. उपस्थीत सर्व मान्यवरांनी बालकांना निरोगी आरोग्याच्या आणि बालदिनाच्या शुभेच्छा दिल्यात. या उपक्रमासाठी एमआर तेजस उगले यांचे सहकार्य लाभले.

# १२ वर्षीय मुलीवर स्प्लीनोक्टॉमी शस्त्रक्रिया यशस्वी

**पाचोरा – जन्मापासूनच स्प्लीनोमेगाली (प्लिहा) आजाराने त्रस्त मुलीने तब्बल १२ वर्षे त्रास सहन करत असतांना डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय रूग्णालयात केलेली शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने आजारातून मुक्तता झाली आहे.**



पाचोरा येथील १२ जयश्री मराठे हिला जन्मजात प्लिहाचा त्रास होता वयाच्या दुसऱ्या वर्षापासून असहय वेदना सहन करत विविध उपचार सूरू होते पण काहीच उपयोग झाला नाही. अशातच वयाच्या १२ वर्षी अचानक त्रास जाणवल्याने तिला अत्यवस्थ अवस्थेत डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय रूग्णालय येथे दाखल करण्यात आले. बालरोग शल्यचिकीत्सक डॉ. मिलिंद जोशी यांनी तपासण्यानंतर शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. शस्त्रकियेआधी मॅनिंगोकोकल आणि न्युमोकोकल लस जयश्रीला देण्यात आली. डॉ. श्रीयश सोनवणे, भुलरोग तज्ञ डॉ सतिष, डॉ विजया यांच्या सहकार्यांने तिच्यावर स्पिनोक्टॉमी प्रकाराची यशस्वी शस्त्रक्रिया दुर्बिणव्दारे महात्मा फुले जनआरोग्य योजनेत मोफत करण्यात आली.

अवघ्या १२ वर्षीय मुलीची प्लिहा (स्प्लिन) मोठी झाली होती. त्यामुळे हिमोग्लोबिन, पांढऱ्या पेशी, प्लेटलेटसचे प्रमाण खूप कमी होऊन दम लागणे, धाप लागणेसह इतर अनेक त्रासांमुळे तिचे जगणेच कठीण होऊन बसले होते. संबंधित रुग्णाच्या प्लिहाने संपूर्ण पोट व्यापले होते. अशा वेळी पोट-छाती उघडून शस्त्रक्रिया केली जाते; परंतु रक्त गोठण्याची क्रिया मंदावल्यामुळे रक्तस्त्रावाची मोठी शक्यता असते. अशा स्थितीत दुर्बिणीद्वारे जोखमीची शस्त्रक्रिया रुग्णालयात यशस्वी झाली ती अत्याधुनिक सुविधांमुळे डॉ. श्रीयश सोनवणे

## कासोद्यात २९ नोव्हेंबरला आरोग्य शिबीर

**एरंडोल –** तालुक्यातील कासोदा येथे ग्रामपंचायत कार्यालय व गोदावरी फाऊंडेशनतर्फे मंगळवार, दि.२९ नोव्हेंबर रोजी महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी १०.३० ते २ यावेळेत होणार्या शिबिरात मोफत टू डी इको तपासणी, ईसीजी कार्डिओग्राफ, मधुमेह, रक्तदाब तपासणी करण्यात येणार आहे.

याशिवाय कान-नाक-घसा, नेत्रविकार, स्त्रीयांचे आजार, हाडांची दुखणी - मणक्यांचे विकार, हृदयविकार, दारुमुळे उद्भवणारे विकार, त्वचाविकार, मानसिक आजारांवर उपचार केले जाणार आहे.

अधिक माहितीसाठी सरपंच महेश पांडे, उपसरपंच शेख अब्दुल अजीज, सुरेश चौधरी, बापू महाजन यांच्याशी संपर्क साधावा.

## रोजगार वार्ता

**भारतीय हवाई दलात अग्निपथ योजनेअंतर्गत भरती**

**कोर्सचे नाव:** अग्निवीरवायु इनटेक ०१/२०२३ Total: पद संख्या तूर्तास निर्दिष्ट नाही. **पदाचे नाव:** अग्निवीर वायु **शैक्षणिक पात्रता:** ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण किंवा मेकॅनिकल/इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रॉनिक्स/ऑटोमोबाईल/कॉम्प्युटर सायन्स/इन्स्ट्रुमेंटेशन टेक्नॉलॉजी/खढ इंजिनिअरिंग डिप्लोमा किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. भौतिकशास्त्र आणि गणित. **शारीरिक पात्रता:** उंची/छाती पुरुष महिला उंची १५२.५ सेमी १५२ से.मी. छाती ७ ७ से.मी./ किमान ०५ सेमी फुगवून. – **वयाची अट:** जन्म २७ जून २००२ ते २७ डिसेंबर २००५ दरम्यान. **नोकरी ठिकाण:** संपूर्ण भारत. Fee: २५०/- Online **अर्ज करण्याची शेवटची** तारीख: २३ नोव्हेंबर २०२२

**महाराष्ट्र राज्य पोलीस भरती १८३३१ जागा**

१. पोलीस शिपाई १४९५६, २. चालक पोलीस शिपाई चालक२१७४, ३.राज्य राखीव पोलीस बल सशस्त्र पोलीस शिपाई (SRPF), **शैक्षणिक पात्रता:** १. **पोलीस शिपाई:** इयत्ता १२वी उत्तीर्ण.२. पोलीस शिपाई चालक: (i) इयत्ता १२वी उत्तीर्ण. (ii) हलके वाहन चालक परवाना (LMV-TR) ३. राज्य राखीव पोलीस बल सशस्त्र पोलीस शिपाई: इयत्ता १२वी उत्तीर्ण. **शारीरिक पात्रता:** उंची/छाती पुरुष उंची १६५ सेमी पेक्षा कमी नसावी (SRPF: १६८ सेमी)१५८ सेमी पेक्षा कमी नसावी, छाती न फुगवता ७९ सेमीपेक्षा कमी नसावी, **वयाची अट:** ३० नोव्हेंबर २०२२ रोजी, मागास प्रवर्ग :०५ वर्षे सूट, १. पोलीस शिपाई: १८ ते २८ वर्षे. २. चालक पोलीस शिपाई: १९ ते २८ वर्षे. ३. राज्य राखीव पोलीस बल सशस्त्र पोलीस शिपाई: १८ ते २५ वर्षे. **नोकरी ठिकाण:** संपूर्ण महाराष्ट्र Fee: खुला प्रवर्ग: ४५०/- मागास प्रवर्ग: ३५०/-Online **अर्ज करण्याची शेवटची तारीख:** ३० नोव्हेंबर २०२२

# डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ओटी निर्जंतुक प्रक्रियेवर कार्यशाळा

**जळगाव – जळगाव – इंडियन मेडिकल असोसिएशनच्या हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियन मेडिकलच्या अध्यक्षपदी जळगावातील युरोलॉजिस्ट डॉ.अनिल पाटील यांची अध्यक्षपदी तर जनरल सर्जन डॉ.स्नेहल फेगडे यांची खजिनदारपदी निवड झाली आहे.**





शिर्डी येथे शुक्रवार दि.१८ नोव्हेंबर रोजी वार्षिक परिषदेसह सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र आयएमए अध्यक्ष डॉ.सुहास पिंगळे, सचिव *डॉ.मंगेश पाटे,* प्रेसिडेंट इलेट *डॉ.रविंद्र कुटे* हे होते. याप्रसंगी हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियन मेडिकलच्या अध्यक्षपदी जळगावातील डॉ.अनिल पाटील यांची अध्यक्षपदी तर डॉ. स्नेहल फेगडे यांची निवड जाहिर करण्यात आली. याशिवाय मागील वर्षी केलेल्या कामाची दखल घेत डॉ.अनिल पाटील व डॉ.स्नेहल फेगडे यांना प्रेसिडेंट ॲप्रीसिएशन ॲवार्डने मान्यवरांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले. या निवडीबद्दल डॉ.पाटील व डॉ.फेगडे यांचे गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील, सदस्या डॉ.केतकी पाटील, डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ.वैभव पाटील यांच्यासह जळगाव आयएमएतर्फे अभिनंदन करण्यात आले.



**इंडियन मेडिकल असोसिएशनच्या हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियन मेडिकल संघटेवर डॉ.अनिल पाटील आणि डॉ.स्नेहल फेगडे यांची निवड ही निश्चितच अभिनंदनास्पद बाब आहे. वैद्कीय क्षेत्रात या दोन्ही डॉक्टरांच मोठ्ठ योगदान राहिलं आहे.**

**– डॉ.उल्हास पाटील, अध्यक्ष, गोदावरी फाऊंडेशन**

---


**कार्याची दखल, बहुमान प्राप्त**

मागील १२ ते १३ वर्षापासून आयएमएमध्ये सक्रीयपणे कार्यरत असल्यामुळे डॉ.पाटील व डॉ.फेगडे यांना मिळालेली ही जबाबदारी हा बहुमान आहे, त्याबद्दल त्यांचा सत्कार व शुभेच्छा जळगाव आयएमए अध्यक्ष डॉ.दिपक आठवले, सेक्रेटरी डॉ.जितेंद्र कोल्हे यांच्यासह सदस्यांनी दिल्यात.

# फिस्टूओटॉमी करुन ६० वर्षीय रुग्णाची त्रासातून सुटका

**जळगाव – डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात ६० वर्षीय रुग्णावर फिस्टूओटॉमी करुन त्याची त्रासातून सुटका केली. डॉक्टरांनी घेतलेल्या मेहनतीमुळे आता बरे वाटत आहे, अशी भावना रुग्णाने व्यक्त केली.**

सविस्तर वृत्त असे की, संडासला अति जोर लावणे, अति बसणे यामुळे संडासच्या जागेवर खाज येणे, तिथे पू निघणे यामुळे असहय्य वेदना रुग्णाला झाल्या, उपचारार्थ रुग्णालयात दाखल झाल्यावर शस्त्रक्रिया तज्ञांनी शस्त्रक्रिया केली, त्यावेळी संपूर्ण उपचार होवू न देताच मनानेच घरी जाण्याचा निर्णय रुग्णाने घेतला. परिणामी सहा महिन्यांनंतर पुन्हा तीच समस्या उद्धवल्याने रुग्ण रुग्णालयात आला, येथे शस्त्रक्रिया तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली निवासी तज्ञ डॉ.श्रीयश सोनवणे, डॉ. सेजोल कश्यप यांनी फिस्टूओटॉमी करुन खराब भाग स्वच्छ केला. पुरुष शस्त्रक्रिया वॉर्डमध्ये नर्सिंगचे दिक्षा कांबळे, उज्वला, रायपुरे, शुभम, गजेंद्र, राहूल, दामिनी, वंदना, विद्या, राहूल वाघ यांनी देखभाल केली.



यावेळी रुग्ण वामन साळुंके यांनी रुग्णालयासह डॉक्टरांचे आभार मानले. तसेच सहा महिन्यांपूवी डॉक्टरांचे ऐकून उपचाराचे पूर्ण दिवस केले असते तर आज पुन्हा दाखल नसतो झालो. त्यामुळे रुग्णांनी डॉक्टरांचे ऐकून त्यांच्या सल्ल्यानेच घ्यायला हवे, असे आवाहनही केले.

# तोंडातून रक्त येणाऱ्या ६५ वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार

**जळगाव – अस्थमाचा त्रास असलेल्या रुग्णावर डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील मेडिसीन विभागाच्या अतिदक्षता विभागात करण्यात आलेल्या तातडीच्या उपचारामुळे रुग्णाचे प्राण वाचले असून रुग्णाची प्रकृती स्थिर आहे.**

यावल तालुक्यातील रहिवासी अनिल (नाव बदललेले) यांना मागील २० वर्षापासून अस्थमाचा त्रास आहे. १३ ऑक्टोबर रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आलेला रुग्ण बेशुद्धावस्थेत होता. तातडीने निवासी डॉ. जुनेद कामेली, डॉ.तेजस कोटेचा यांनी रुग्णाला इंटीब्यूट करीत आवश्यक तपासण्याही केल्या. यावेळी रुग्णाचा हार्टरेट लो होता. चार दिवस रुग्ण व्हेंटीलेटरवर होता.

दरम्यान रुग्णाला मुखाद्वारे रक्तस्त्रावही होत होता, पोटात हवा गेली होती, पोट फुगले होते. यावेळी ॲण्टीबायोटिकसह मेडिकल मॅनेजमेंट करण्यात आले, नाकातून नळी टाकून औषधोपचार सुर होता. महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णावर उपचार करण्यात आले. रुग्णाची प्रकृती स्थिर झाल्यावर त्याला मेडिसीन विभागाच्या सामान्य वार्डात शिफ्ट करण्यात आले. तेथे डॉ. पाराजी बाचेवार, डॉ.सी.डी.सारंग यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरु आहे.

